RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १०४] मंगळवार, जुलै ७, २०२६/आषाढ १६, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३९०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ७ जुलै २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९.**

क्रमांक कृवपदुम-२८०१६/३२४/२०२५-MAG-१७A (१५०४१८३).—महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९ (२००९ चा महा. १९) याच्या कलम २२चे पोट-कलम (१) सह कलम ७ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) नियम, २०१० यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम २२, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

**१.** या नियमांना महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२६ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) नियम, २०१० त्यांच्या नियम १० नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

"**१०अ. बियाणे निरीक्षकाची पात्रता.**—कोणतीही व्यक्ती शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातून कृषी विषयात पदवीधर असल्याशिवाय बियाणे निरीक्षक म्हणून नियुक्तीस पात्र ठरणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संतोष कराड,**
शासनाचे उप सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 7th July, 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA COTTON SEEDS (REGULATION OF SUPPLY, DISTRIBUTION, SALE AND FIXATION OF SALE PRICE) ACT, 2009.

No. कृवपदुम-28016/324/2025-MAG-17A (1504183).—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 22 read with sub-section (*1*) of the section 7 of the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Act, 2009 (Mah. XIX of 2009) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Rules, 2010, after the same having been previously published as required by sub-section (*1*) of section 22 of the said Act, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, Distribution, Sale and Fixation of Sale price) (Amendment) Rules, 2026.

**2.** In the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, Distribution, Sale and Fixation of Sale price) Rules, 2010, after rule 10, the following rule shall be inserted, namely :—

"**10A.** *Qualification of Seed Inspectors.*—A person shall not be qualified for appointment as Seed Inspector unless he is a graduate in Agriculture of a University recognised for the purpose by the Government."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH KARAD,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.